




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : ०७९ ● पुणे ● सोमवार, दि. ३ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




जीबीएसला घाबरु नका फक्त खबरदारी घ्या 3



पाणी टंचाईचे संकट कायम 4

## ठळक बातम्या

### आरटीई प्रवेश अर्जांची मुदत संपुष्टात

पुणे (आरंभ पर्व) : शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत अर्ज करण्याची मुदत रविवारी संपली. या मुदतीत ३ लाखांहून अधिक अर्ज दाखल झाले असून, आता अर्ज प्रवेशासाठी सोडत काढण्यात येणार आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. आरटीईअंतर्गत आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेश देण्यात येतो. प्रवेशित विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपूर्ती राज्य सरकारकडून शाळांना करण्यात येते. यंदा राज्यभरातील ७ हजार ८६३ शाळांमध्ये प्रवेशासाठी १ लाख ९ हजार १११ जागा उपलब्ध आहेत.

### नागपूरमधून आणखी दोघे अटकेत

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट ब संयुक्त पूर्व परीक्षेची प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देतो, असे सांगून ४० लाखांची मागणी करणारी ध्वनिफीत नुकतीच प्रसारित झाली होती. याप्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने नागपूरमधून आणखी दोघांना अटक केली. याप्रकरणी योगेश सुरेंद्र वाघमारे (वय २७, रा. वराठी, जि. भंडारा), दीपक यशवंत साकरे (वय २७, रा. टेकाडी, बालाघाट, मध्य प्रदेश) यांना अटक करण्यात आली. यापूर्वी दीपक दयाराम गायधने (वय २६ वर्षे, चाकण, मूळ. रा. तुमसर जि. भंडारा), सुमित कैलास जाधव (वय २३, चाकण, मूळ रा. नांदगाव, जि. नाशिक) यांना अटक करण्यात आली होती. याबाबत एमपीएससीच्या सचिव सुवर्णा खरात यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.रविवारी एमपीएससी गट ब (अराजपत्रीत) संयुक्त पूर्व परीक्षेची प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिकेसह दिली जाईल. त्यासाठी ४० लाख रुपये द्यावे लागतील, अशी ध्वनिफीत प्रसारित झाली होते.

### सोन्याच्या दागिन्यांचा अपहार

पुणे (आरंभ पर्व) : महिलेला जाळ्यात ओढून पतीच्या मृत्यूनंतर पाच लाख रुपये आणि सोन्याच्या दागिन्यांचा अपहार, तसेच विवाहास नकार देऊन फसवणूक केल्याप्रकरणी पोली शिपायाविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महिलेसा मारहाण, तसेच फसवणूक करणाऱ्या पोलीस शिपायाला पोलीस दलातून निलंबित करण्याचे आदेश परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिले. तुषार अनिल सुतार असे निलंबित करण्यात आलेल्या पोलीस शिपायाचे नाव आहे. तो खडक पोलिस ठाण्यात नियुक्तीस होता. फिर्यादी महिला, पती आणि मुलीसह शहरातील मध्यभागात राहायला आहे. २०१९ मध्ये महिलेची पोलीस शिपाई तुषार सुतार याच्याशी समाज माध्यमात ओळख झाली. ओळखीतून त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. विवाहित असून, मी पत्नीबरोबर राहत नाही. माझ्याबरोबर राहशील का ? अशी विचारणा सुतारने महिलेकडे केली. महिलेने त्याला नकार दिला.

# केसेस टाकू नका

## राज ठाकरेंनी भर व्यासपीठावर मंत्र्याला बजावलं



### ऐतिहासिक विषयांवर दोन नवीन चित्रपट

**अभिनेते रितेश देशमुख यांच्या चित्रपटाचा उल्लेख करत सांगितले की, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक चित्रपट येत आहे. यानंतर संभाजी महाराजांवरही नवीन चित्रपट येणार आहे."**

### जातीयवादाचा निषेध

**राज ठाकरे यांनी जातीपातीच्या राजकारणावर टीका करत म्हटले की, "आपल्या महापुरुषांना जातीपातीमध्ये अडकवू नका. प्रत्येक महापुरुष हा संपूर्ण महाराष्ट्राचा आहे."**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी विश्व संमेलनात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषेच्या संवर्धनावर भर दिला. तीन दिवसीय साहित्य संमेलनाच्या सांगता सोहळ्यात त्यांनी स्पष्ट शब्दांत मराठी भाषा, तिच्या अस्तित्वासाठी आणि मराठी माणसाच्या हक्कांसाठी आवाज उठवला.

मराठी भाषेच्या सन्मानासाठी आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी राज ठाकरे यांनी जोरदार भाषण केले. त्यांनी साहित्यिकांना समाजाला दिशा देण्याचे आवाहन केले, सरकारला मराठी माणसांचे हक्क जपण्यास सांगितले आणि तरुण पिढीला मराठी वाचनसंस्कृती जोपासण्याचा सल्ला दिला.

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच मिश्किल अंदाजात म्हटले, "तुमच्या मनात प्रश्न असू शकतो की, मी इथे कसा आलो? पण उदयजींनी मला आग्रह केला आणि मी आलो." या विधानाने उपस्थितांमध्ये हास्याची लहर उमटली.

राज ठाकरे यांनी भाषेच्या महत्त्वावर भर देत सांगितले की, "आपली मुलं एकमेकांशी हिंदीत बोलत आहेत, ही चिंतेची बाब आहे. आपण जर आपल्या भाषेबाबत ठाम राहिलो, तरच जग आपल्याला किंमत देईल."

त्यांनी 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताचा उल्लेख करत विचारले की, "कुठल्या राज्याचे असे स्वतंत्र गीत आहे?" यावरून त्यांनी महाराष्ट्राच्या वैभवाचा आणि इतिहासाचा पुनरुच्चार केला.

"मराठी माणसाचं अस्तित्व जपायला हवं. राज्य सरकारने शहरांमध्ये मराठी माणसांना स्थान मिळवून द्यायला हवं," असे म्हणत त्यांनी मराठी बांधवांच्या भविष्यासाठी चिंता व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, "हिमाचल प्रदेशमध्ये भारतीय असूनही जमीन खरेदी करता येत नाही, मग महाराष्ट्रात बाहेरचे लोक सहज जमिन का विकत घेतात?" या विधानातून त्यांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

"अभिनेत्यांना पुरस्कार मिळतात, पण आम्हाला फक्त तिरस्कार मिळतो," असे म्हणत त्यांनी कलाकार आणि राजकारण्यांच्या मिळणाऱ्या वेगवेगळ्या प्रतिसादांवर भाष्य केले. त्यांनी उपस्थित साहित्यिकांना विनंती केली की, "साहित्यिकांनी समाजासाठी योग्य दिशा दाखवली पाहिजे. राजकीय मतं मांडणं गरजेचं आहे."

राज ठाकरे यांनी उदय सामंत यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, "मराठी भाषेसाठी काही करत असू, तर त्याला पाठिंबा द्या, केसेस टाकू नका." राज ठाकरे यांनी तरुणाईला वाचनसंस्कृती वाढवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "संमेलनातून बाहेर पडताना प्रत्येकाने किमान १० पुस्तके विकत घ्यावीत."

## मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू

### मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचा इशारा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रात मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू, असा इशारा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिला. येत्या पंधरवड्यात माझ्या विभागाअंतर्गत राज्यातील सर्व पोलीस अधीक्षकांची बैठक बोलावून त्यांना या संदर्भात सूचना करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भाषेच्या संवर्धनासाठी मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायासंदर्भात राज ठाकरे आणि त्यांचा पक्ष करत असलेले काम कौतुकास्पद आहे. शासन म्हणून आम्ही त्यांच्या भूमिकेसोबत राहू, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

'आपलीच भाषा बोलली पाहिजे असा अन्य राज्यातील लोकांचा दबाव मुंबई, ठाणे, मुंब्रा, पुणे येथे काही लोक आणत आहेत. गेल्या तीन महिन्यांत हे प्रकार वाढल्याचे दिसून येत आहे. याबद्दलचा कायदा आहे. परंतु असा दबाव आणून मराठी भाषा बोलल्याबद्दल जर मारहाण होत असेल, तर हा कायदा कडक झाला पाहिजे', असे सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या विषयासंदर्भात पोलीस अधीक्षकांच्या बैठकीनंतर आवश्यकता भासल्यास शासन अध्यादेश काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी आमदार चंद्रकांत मोकाटे आणि महादेव बाबर यांची भेट हा 'मिशन टायगर'चा भाग नव्हता. पण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदरापोटी कोणी पक्षात येऊ इच्छित असेल तर मिशनशिवायही ते येऊ शकतात, असे खुले आमंत्रण सामंत यांनी दिले.

निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री होतील, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती, या ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केलेल्या दाव्यासंदर्भात बोलताना सामंत म्हणाले, 'आता हे शहा यांना आणि ज्यांनी सांगितले त्यांना विचारले पाहिजे. राऊत यांना पत्रकार परिषद घेण्याचे व्यसन लागले आहे.' आता मी त्यांच्या वेळेच्या आधी पत्रकार परिषद घ्यावी म्हणतो आहे, अशी मिश्किल टिप्पणीही सामंत यांनी या वेळी केली.









# काँग्रेसचे डोके फिरले आहे काय?



संसदेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी संपूर्ण देशाला राष्ट्रपतींच्या अभिभाषणाची प्रतीक्षा असते. राष्ट्रपतींच्या अभिभाषणातून देशाची वाटचाल, प्रगतीची सद्यस्थिती, देशापुढील वाटचाल, अडचणी, आर्थिक घडामोडी यांचे चित्र स्पष्ट होते. राष्ट्रपतींच्या अभिभाषणातून विद्यमान पंतप्रधानांच्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेतला जातो. तसा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेतला. मागील अर्थसंकल्प आणि मोदी सरकारच्या कृती योजनांचा फायदा झाला. समाजातील प्रत्येक घटकाला याचा फायदा झाला. हा एक असा लेखाजोखा होता जो केवळ नेत्रदीपक होता, याबाबतचे प्रशंसोद्गारही राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या भाषणातून काढले. विरोधकांनीही मुर्मू यांनी सादर केलेल्या अभिभाषणाची एकतर प्रशंसा करणे आवश्यक होते अथवा अभिभाषणामध्ये विकासकामांची करण्यात आलेली प्रशंसा कशा प्रकारे चुकीची आहे, विकासकामांची गती कशी मंदावली आहे, हे सभागृहात मांडत अभिभाषणाचा पंचनामा करणे आवश्यक होते. एक सक्षम विरोधी पक्षाकडून जनतेची हीच अपेक्षा असते; परंतु सत्ताधाऱ्यांच्या कामाची प्रशंसा करण्याइतपत औदार्य अजूनही आपल्या भारतीय लोकशाहीत कार्यरत असणाऱ्या राजकारण्यांमध्ये रुजलेले नाही, ही एक प्रकारची शोकांतिकाच आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर सभागृहात १०० खासदारांचे संख्याबळ असलेल्या काँग्रेस पक्षाच्या नेतेमंडळींकडून मुक्ताफळे उधळण्यात आली, त्यावरून देशवासीयांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. काँग्रेसच्या नेत्या व राज्यसभेच्या खासदार सोनिया गांधी यांनी राष्ट्रपतींचा उल्लेख पुअर लेडी असा केला. तर त्यांचेच सुपुत्र खासदार राहुल गांधी यांनी राष्ट्रपती मुर्मू यांचे भाषण कंटाळवाणे असल्याचे म्हटले. यावरून काँग्रेसी नेत्यांची मानसिकता उघडपणे पाहावयास मिळते. सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर विविध स्तरातून टीकेची झोड उठण्यास सुरुवात झाली आहे. यावरून राजकारणही तापण्यास सुरुवात झाली. यावर भाजपानेही जोरदार पलटवार केला आहे. विकसित भारत हे आपले ध्येय असल्याचे सांगत राष्ट्रपतींनी संसदेत आपले अभिभाषण केले होते. आदिवासी समाजाच्या महिलेला देशाच्या सर्वोच्च स्थानी विराजमान करून भाजपाने देशातील आदिवासी समाजाचा केवळ उक्तीतून नव्हे तर कृतीतून खऱ्या अर्थाने गौरव केला आहे. सोनिया गांधी यांनी अभिभाषणानंतर त्याच राष्ट्रपती मुर्मू यांचा 'पुअर लेडी' असा जाहिररीत्या उल्लेख करत एकप्रकारे आदिवासी समाजाचाच अपमान केल्याचा सूर आता देशाच्या कानाकोपऱ्यांतून आळविला जात आहे. एकीकडे भाजपाकडून गौरवाची भूमिका आणि सोनिया गांधी व राहुल गांधींकडून काढले जाणारे अपमानास्पद वक्तव्य हा विरोधाभास यानिमित्ताने देशवासीयांपुढे आला आहे. यानिमित्ताने काँग्रेसचा दुटप्पी चेहरा पुन्हा एकवार समोर आला असल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेसच्या घोषणा या केवळ निवडणूक काळापुरत्याच सीमित असतात, निवडणुका संपल्यावर वास्तवामध्ये त्या घोषणांशी काँग्रेसचा काडीमात्रही संबंध नसतो.

१९५२ पासून चालत आलेल्या देशाच्या संसदीय कारभारात पाहावयास मिळालेले आहे. काँग्रेसने आजवर केवळ घोषणा देऊन देशवासीयांची दिशाभूल करत केंद्रातील सत्ता अमर्याद काळ उपभोगलेली आहे. २०१४ पर्यंत हेच चित्र कायम होते. केवळ गरिबी हटाव या एकमेव घोषणेवर काँग्रेसने एक लोकसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवित देशाची पाच वर्षे सत्ता उपभोगली होती. काँग्रेसला सत्ता मिळाली, परंतु या देशातून गरिबी काही हटली नाही आणि ती हटविण्यासाठी काँग्रेसकडूनही काही विशेष प्रयत्न केले गेले नाहीत. मात्र सतत देशाची सत्ता उपभोगताना काँग्रेसच्या नेत्यांची मात्र गरिबी हटली, ती इतकी हटली की सुखराम नामक केंद्रीय मंत्र्यांच्या बेडरूममधील गादीमध्ये तब्बल सहा कोटींची रोकड सापडावी, इतकी श्रीमंती काँग्रेसच्या नेतेमंडळींकडे सतत देशाची सत्ता उपभोगून आली आहे. त्यामुळे राष्ट्रपतींवर अभिभाषणानंतर टीका करणाऱ्या काँग्रेसी नेत्यांचे डोके फिरले आहे काय? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.भिभाषणानंतर राष्ट्रपती मुर्मू यांच्याबाबत काँग्रेसच्या सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी अपमानास्पद वक्तव्य काढताना देशातील आदिवासी समाजाचा अपमान केला आहे. यातून काँग्रेसी नेत्यांची आदिवासी समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही व्यक्त झाला. २०१४ साली केंद्रातून सत्ता गेल्यानंतर आणि २०१९ आणि २०२४ साली झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीतही भारतीय मतदारांनी भाजपालाच सत्तेवर विराजमान केल्याने सत्ता मिळत नसल्याने कदाचित काँग्रेसच्या नेत्यांचे मानसिक संतुलन ढासळले असावे, असाही सूर आता देशातील जनतेकडून आळविला जात आहे. भाजपाने सलग तिसऱ्यांदा देशाची सत्ता मिळविली.

२०१४ पासून देशाचा कारभार पाहताना मोदींच्या नेतृत्वाखाली देशाला प्रगतिपथावर नेत असताना भाजपाप्रणीत केंद्र सरकारमधील मंत्र्यांनी भ्रष्टाचार केल्याचे कोणतेही उदाहरण आजवर आढळून आले नाही. सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याची कोणतीही संधी मिळत नसल्याने काँग्रेस नेत्यांच्या पायाखालची वाळू सरकली. चर्चेच्या प्रकाशझोतात राहण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांकडून बालिश वक्तव्य करण्याचा पायंडा २०१४ पासून पडलेला आहे. विचित्र वक्तव्य करून जनतेत चर्चेमध्ये राहण्याचा केविलवाणा उद्योग काँग्रेसच्या नेतेमंडळींकडून नेहमीच केला जातो. खासदार राहुल गांधी तर यात आघाडीवर आहेत. राहुल गांधी हे संसदेत, देशामध्ये, अगदी परदेशात फिरायला गेल्यावरही देशाबाबत उलटसुलट वक्तव्य करतात. यामुळे त्यांना काही काळ प्रसिद्धी मिळत असली तरी जागतिक पातळीवर भारताची प्रतिमा मलीन हात असल्याचेही भान राहुल गांधींना राहू नये हे आपल्या देशाचे दुर्दैव आहे. देशवासीयांनीच आता काँग्रेस नेत्यांना ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. कोणत्याही गोष्टीला मर्यादा असतात. काँग्रेसने टीका करण्याच्या नादात अनेकदा मर्यादांचे उल्लंघन केले आहे. देशाच्या राष्ट्रपती म्हणजे कोणतेही राजकीय नेते नाहीत, तर देशाचे ते सर्वोच्च घटनात्मक पद आहे. त्यांचा अपमान हा देशाचा अपमान आहे. त्यामुळे काँग्रेसी नेत्यांचा निषेध करून त्यांना जाब विचारणे आवश्यक आहे. भारतीयांनी असे केले तर पुन्हा अशी वक्तव्ये करण्याचे धाडस काँग्रेसी नेत्यांकडून दाखविले जाणार नाही.

# मानवी साखळी न्याय हक्कांसाठी!



## नितीन गायकवाड

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**

कर्वेनगर आणि सनसिटी सिंहगड रोड यांना जोडणारा उड्डाणपूल पाठपुरावा केल्याने आज सत्यात उतरत आहे. परंतु भविष्यातील वाहतूक समस्या टाळण्यासाठी हा उड्डाणपूल पूर्ण होण्यापूर्वी कर्वेनगर हद्दीमधील शिवणे ते खराडी या रस्त्याचे काम पूर्णत्वास जाणे ही काळाची गरज आहे.

कर्वेनगर प्रभागातील तब्बल ४० सोसायटी एकत्र येत प्रशासनाच्या डोळ्यांत अंजन घालण्यासाठी मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. या साखळीत लोकप्रतिनिधी तसेच एक जागरूक नागरिक आणि एक स्वयंसेवक म्हणून मा. नगरसेवक स्वप्नील लक्ष्मी देवराम दुधाने आणि त्यांच्या आई मा. नगरसेविका लक्ष्मीताई उपस्थित होते.

तब्बल दीड ते दोन किमी लांब मानवी साखळीमध्ये महिलावर्गाचा असणारा सहभाग उल्लेखनीय होता. तसेच प्रत्येक सदनिकेतील नागरिकांनी यावेळी उपस्थिती दर्शवली. अत्यंत शिस्तबद्ध आणि शांततेच्या मार्गाने सुरू असलेली ही मानवी साखळी दुधाने लॉन्स येथील श्री विठ्ठेश्वर देवस्थान ते वेदांतनगरीपर्यंत नागरिकांनी आपली भूमिका मांडली. यावेळी पुणे मनपाचे पथ विभागाचे मुख्य अनिरुद्ध पावसकर यांनी निवेदन स्वीकारले तसेच प्रशासनाची भूमिका नागरिकांना समजावून दिली.




अण्णाभाऊ साठे सभागृह ते धायरी मारुती मंदिर परिसरातील

# ड्रेनेजसाठी ४० लाख मंजूर

## बापूसाहेब पोकळे यांच्या पाठपुराव्यास यश



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी मारुती परिसरातील खडक चौक अण्णाभाऊ साठे सभागृह ते मारुती मंदिर परिसरातील ड्रेनेज कामासाठी 40 लाख निधी मंजूर झाला आहे. ह्या परिसरात

पावसाळी, ड्रेनेज लाईन संदर्भात खडकवासला विधानसभा भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी पाठपुरावा केला होता. अखेर त्यास यश आले. जनतेच्या सेवेसाठी करत सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून आण्णाभाऊ साठे सभागृह ते मारुती मंदिर धायरी स्ट्रॉम वॉटर लाईन टाकण्याकरिता विशेष निधी मंजूर करण्यात आलेला आहे.त्याबद्दल संबंधित अधिकारी दिनेश गोजारे, निशिकांत छापेकर यांचे मनापासून आभार मानत असल्याची प्रतिक्रिया श्री. बापूसाहेब पोकळे यांनी दिली आहे.

लवकरच ह्या कामाची सुरुवात होणार असल्याचे अभियंता निशिकांत छापेकर यांनी सांगितले.

समाविष्ट गावातील अनेक भागात पावसाळी लाईन, ड्रेनेज समस्या, अपुरा पाणीपुरवठा ह्या समस्या सातत्याने भेडसावत आहेत.

पुणे महानगरपालिकेवर क्षेत्र अधिक मोठे असल्याने टप्प्याटप्प्याने काम करावे लागत आहे. धायरी व भागातील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले बापूसाहेब पोकळे यांनी जनहिताला प्राधान्य दिले आहे. हे यानिमित्त दिसून येत आहे. त्यांनी सातत्याने ह्या कामासाठी महानगरपालिकडे पाठपुरावा केला होता.

## थोडक्यात




### 'कीर्तने अँड पंडित' संस्थेतर्फे 'रन फॉर द रिपब्लिक' मॅरेथॉन

पुणे (आरंभ पर्व) : ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून कीर्तने अँड पंडित संस्थेच्या वतीने 'रन फॉर द रिपब्लिक' मॅरेथॉन २०२५ चे नुकतेच आयोजन केले होते. कर्वे रस्त्यावरील कीर्तने अँड पंडित संस्था, दशभुजा गणपती, करिष्मा सोसायटी चौक, कर्वे रोडने कर्वे पुतळा, शिवाजी महाराज चौक, कर्वे रोडने पुन्हा कीर्तने अँड पंडित या मार्गाने ही मॅरेथॉन झाली. तीन किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये संस्थेतील सर्व पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते. कीर्तने अँड पंडितचे सीए मिलिंद लिमये, सीए पराग पानसरे आदी उपस्थित होते. बाबू बावधने, यश दाते, श्रवण बिश्नोई व धैवत आपटे यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकाने, तर इतर सर्व सहभागींना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. स्नेहा पाटोळे व सहकाऱ्यांनी मॅरेथॉनचे यशस्वी संयोजन केले. सीए मिलिंद लिमये म्हणाले, "लोकशाही उत्सव साजरा करण्यासाठी व सर्वांमधील एकात्मता जपण्यासाठी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने 'रन फॉर रिपब्लिक' मॅरेथॉनचे आयोजन केले होते. संस्थेतर्फे दरवर्षी आजच्या दिवशी सामाजिक उपक्रम आयोजित केला जातो. यापूर्वीही 'मेरा तिरंगा मेरा अभिमान' ध्वज संकलन मोहीम, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान असे विविध उपक्रम राबविण्यात येतात."


प्रा. भारती जाधव


प्रा. सायली गोसावी

### अध्यक्षपदी प्रा. भारती जाधव, सचिवपदी प्रा. सायली गोसावी

पुणे (आरंभ पर्व) : गौतम बुद्ध, भगवान महावीर आणि संत कबीर या महामानवांच्या मूल्यविचारांच्या अभ्यासक प्रा. भारती जाधव यांची विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या अध्यक्षपदी, तर औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील प्रा. सायली गोसावी यांची सचिवपदी निवड करण्यात आल्याची माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या संविधानिक मूल्यांबरोबरच मानवता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी समितीच्या वतीने विविध स्वरूपाचे कार्यक्रम आणि उपक्रम राबविले जातात, असे रोकडे यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. संजय गायकवाड आणि प्राचार्य डॉ. अरुण आंधळे यांनी प्रा. जाधव व प्रा. गोसावी यांचे अभिनंदन केले.

# विकासाभिमुख केंद्रीय अर्थसंकल्प - डॉ धनंजय दातार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आज जाहीर झालेला केंद्रीय अर्थसंकल्प खरोखर विकासाभिमुख आहे. केंद्र सरकारने कृषी, लघु व मध्यम उद्योग, गुंतवणूक व निर्यात हे प्रगतीचे चालक घटक (इंजिन्स) मानले असून त्यात भरीव व दूरगामी परिणाम घडवणारी पावले टाकली आहेत. नव्या पंतप्रधान धनधान्य कृषी योजनेचा फायदा कमी कृषी उत्पादकता असलेल्या १०० जिल्ह्यांतील १.७० कोटी शेतकऱ्यांना होईल व कृषी उत्पादन वाढेल. डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी तसेच फळे व भाज्या आणि कापूस उत्पादन वाढवण्यासाठी आखलेली दीर्घकालीन योजना स्वागतार्ह आहे. लघु व मध्यम उद्योजकांना विनातारण हमी कर्ज साह्य पाच कोटी रुपयांवरुन वाढवून दहा कोटी रुपये करणे आणि महिला तसेच अनुसूचित जाती व जमाती गटांमधील प्रथमच उद्योजक बनणाऱ्यांना पुढील पाच वर्षांत दोन कोटी रुपयांपर्यंतचे मुदत कर्ज देणे या योजनांमुळे उद्योजकतेत नक्कीच वाढ होईल. तरुणांमध्ये जागतिक दर्जाच्या कौशल्य विकासासाठी पाच नॅशनल सेंटर्स ऑफ एक्सलन्स स्थापन करणे, खासगी क्षेत्राला संशोधन, विकास व अभिनवता पुढाकार राबवण्यासाठी २० हजार कोटींच्या निधीची तरतूद करणे आणि निर्यात वाढीला उत्तेजन देण्यासाठी देशी उद्योगांना साह्य व प्रोत्साहन देणे, ही सरकारची पावले नक्कीच कौतुकास्पद आहेत.

प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराकडून

# पेढे वाटप करून अर्थसंकल्पाचे स्वागत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशाच्या अर्थमंत्री निर्मलाजी सीतारामन यांनी नुकताच देशाचा अर्थसंकल्प सादर केला. ह्या मध्यमवर्गीयांना दिलासा देणाऱ्या या अर्थसंकल्पामुळे नागरिकांचा मोठा फायदा होणार आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ह्याबद्दल हिंगणे येथील जगताप चव्हाण चौकात ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व वृत्तपत्रांमध्ये मुख्य पानावर आलेल्या बातम्यांच्या कात्रणांचे प्रदर्शनही भरवण्यात आले होते. यावेळी माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या समवेत किशोर कुलकर्णी, अनिल बापू वाडकर, राहुल जोशी, सिद्धार्थ शिरोळे, वसंत धारगडे, हनुमंत गायकवाड, चंद्रकांत पायगुडे, श्रीकांत सावंत, भाऊसाहेब निकम, सर्वज्ञ परदेशी, साईराज पाष्टे आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



> **मध्यमवर्गीयांना दिलासा देणाऱ्या या अर्थसंकल्पाचे मध्यमवर्गीयाकडून स्वागत करण्यात येत आहे. हा ही एक कौतुकाचा क्षण आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या त्यांच्या दूरदृष्टीने भारताचा विकासाचा पाया अधिक भक्कम होताना या अर्थसंकल्पातून दिसत आहे. जनतेला अपेक्षित असा हा अर्थसंकल्प आहे.**
>
> **ॲड. प्रसन्नदादा जगताप, माजी उपमहापौर पुणे मनपा**

# आयुर्वेद व आधुनिक शास्त्राच्या मिलापातून प्रभावी उपचारपद्धती विकसित होईल

## डॉ. पी. डी. पाटील यांचे प्रतिपादन; डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठातर्फे डॉ. टोनी नेडर व डॉ. सदानंद सरदेशमुख यांना मानद डॉक्टरेट

**पिंपरी/पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयुर्वेद हे शाश्वत व प्राचीन शास्त्र आहे. वेदिक संस्कृती, भारतीय परंपरा, आयुर्वेदासारखे प्राचीन शास्त्र आणि त्याला तंत्रज्ञानाची मिळालेली जोड मानवी आरोग्यासाठी प्रभावी उपचार पद्धती विकसित करण्यात उपयुक्त ठरेल. आयुर्वेदामध्ये सखोल तंत्रज्ञान व्हावे आणि त्यातून जगाला चांगल्या आरोग्याची संजीवनी द्यावी," असे प्रतिपादन डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी केले.

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठातर्फे वैद्यकीय क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल अमेरिकास्थित न्यूरोसायंटिस्ट डॉ. टोनी नेडर व वाघोली येथील भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टचे अध्यक्ष, आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. सदानंद सरदेशमुख यांना मानद डॉक्टरेट (डॉक्टर ऑफ सायन्स) देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. स्मिता जाधव, खजिनदार डॉ. यशराज पाटील, कुलसचिव डॉ. जे. एस. भवाळकर, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ. गुणवंत येवला आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटरच्या पुढाकाराने विद्यापीठाच्या आवारात आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद परिषदेचे आयोजन केले आहे. यामध्ये देश-विदेशातील सुमारे १२०० पेक्षा अधिक डॉक्टर्स, आयुर्वेदाचार्य व विद्यार्थी सहभागी झाले आहेत. आयुर्वेदिक औषधी व साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. आयुर्वेदातील विविध विषयावर व्याख्याने, शोधनिबंध सादरीकरण व विचार मंथन

# जीबीएसला घाबरु नका फक्त खबरदारी घ्या



**• श्री.राहुलभाऊ पोकळे •**

**संस्थापक अध्यक्ष राष्ट्रसेवा समूह, प्रदेश प्रवक्ते, मुख्य समन्वयक**

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

**शब्दांकन : लक्ष्मण साबळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या महिन्यापासून सिंहगड रोड भागामध्ये जीबीएस हा आजार थैमान घालतोय. यामुळे या भागातील नागरिक व रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे.

अशा परिस्थितीमध्ये राष्ट्रसेवा समूहाचे संस्थापक अध्यक्ष राहुलभाऊ पोकळे यांच्याशी **दैनिक आरंभपर्वने** संवाद साधला..

"जीबीएस हा जुना आजार आहे. पूर्वी तो दुर्मिळ लोकांना व्हायचा मात्र सामूहिक रित्या अनेकांना याची लागण ही पहिल्यांदाच झाल्याचे ऐकायला मिळत आहे. सध्या दूषित पाण्यातून हा आजार होतो अशी शक्यता वैद्यकीय विभागाने कळवले आहे.

मात्र कोणीही घाबरून जाण्याची काही गरज नाही. कारण सरासरी आपणा सर्वांची ह्युमॅनिटी पॉवर ही प्रचंड वाढलेली आहे. कमी इम्युनिटी पॉवर असलेल्या लहान बालकांना व वृद्धांना आजाराचा धोका आहे.

असे असले तरी आपण सर्वांनी शुद्ध पिण्याचे पाणी पिले पाहिजे.पाणी उकळून गार करून पिणे योग्य आहे.

सर्वप्रथम ऑन द स्पॉट मी गेलो. त्यानंतर समाविष्ट गावातील नांदेड गाव, किरकटवाडी, खडकवासला आदी भागातील सार्वजनिक पानवटे तपासले.

यानंतर आमच्या निदर्शनास आले की सार्वजनिक पाणीपुरवठ्यातून ह्या आजाराची लागण झालेचे प्रथमदर्शनी दिसत होते. त्यानंतर स्थानिक नागरिक,रमेश कारंजावणे, सौरभ मते, अविनाश लगड, गोकुळ करंजावणे, कुणाल पोकळे त्यांच्यासह सार्वजनिक विहीर असलेल्या नांदेड गावच्या विहिरीची तपासणी केली. आणि तिथे असलेल्या माध्यमाना मी माहिती दिली.. तेथून पुढे या आजाराचे गांभीर्य नागरिकांसह प्रशासनाला आले. एक दुर्दैवी असे वाटते की ह्या आजारांची लागण होणाऱ्यापेक्षा घाबरणाऱ्यांची संख्या अधिक आहे दिसून येते.

त्यात समाविष्ट गावांना शुद्ध पाणीपुरवठा परंतु होऊ शकला नाही याचीही मला नक्कीच खंत वाटते. ग्राउंड रिपोर्ट केल्यानंतर मला असे दिसून आले की, अनेक कुटुंबातील लोकांना जी बी एस ह्या आजाराची महागडी असलेली ट्रीटमेंट परवडत नव्हती.

त्यामुळे त्यांचा विचार करणे गरजेचे होते. म्हणून मी कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भेटून विविध रीतसर माहिती दिली. "दादा गोरगरीब कुटुंबांना उपचार होण्यासाठी आपण आपल्या माध्यमातून प्रयत्न करावेत".

आणि कर्तव्यदक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री अजितदादांनी लगेच पुणे महानगरपालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांना फोन द्वारे गोरगरीब नागरिकांना उपचार करण्यासाठी आदेश दिले आणि लागलीस



त्यानंतर कमला नेहरू हॉस्पिटल येथे जीबीएस रुग्णावर मोफत उपचार करण्यास सुरुवात झाली.

शिवाय पुणे महानगरपालिकेच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेमार्फत आर्थिक दुर्बल घटकांच्या आरोग्यासाठी दोन लाख रुपयांची मदत करण्यात आली व ही महागडी इंजेक्शन ही सवलतीच्या दरात देण्यात आली.

शिवाय पुणे महानगरपालिकेला सदर जीबीएस ग्रस्त भागातील आरोग्य सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले.

हे सर्व करत असताना अनेकांना उपचारासाठी व या आजाराने घाबरलेल्या नागरिकांना आधार देण्याचा नक्की प्रयत्न केला आहे.

माझे सर्वांना आवाहन असे आहे की , जीबीएस आजार हा पूर्णपणे बरा होऊ शकतो. कोणीही घाबरायचे कारण नाही.

कोरोनाच्या महामारीचा सामना आपण केला आहे , स्वच्छ पाणी पिणे, शिजवलेले अन्न, व वैयक्तिक स्वच्छता ह्या बाबी आपण आत्मसात केल्या तर आपल्याला कधीही जीबीएस होणार नाही.

पुणे महानगरपालिकेला माझी विनंती आहे की आपण समाविष्ट गावाला शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी यंत्रणा कार्यन्वीत करणे गरजेचे आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे ही मागणी लावून धरत आहे.

कोणतेही काम हे श्रेयासाठी करत नसून राष्ट्र सेवा समूह नावाप्रमाणे आम्ही जनतेच्या सेवेला प्राधान्य दिली आहे याचा मला आनंद नक्कीच आहे. असे शेवटी श्री राहुल भाऊ पोकळे यांनी सांगितले."

## भगिनींच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी'



- **राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचे प्रतिपादन**
- **वंचित विकास व उदयकाळ फाउंडेशनतर्फे 'अभया' राज्यस्तरीय परिषद**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"देशभरात महिला अत्याचाराच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ होत आहे. राज्य व राष्ट्रीय महिला आयोग, कौटुंबिक न्यायालयात लाखो तक्रारी प्रलंबित आहेत. ५०-६० टक्के तक्रारी कौटुंबिक वादाच्या असून, या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने देशभर 'महिला आयोग आपल्या दारी' अभियान हाती घेतले आहे. विभागवार सुनावण्या घेऊन या तक्रारींचे निराकरण केले जात आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. दिव्यांगांप्रमाणे 'अभया'लाही सन्मान देण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन रहाटकर यांनी दिले.

वंचित विकास व उदयकाळ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अभया अभियानांतर्गत आयोजित दोन दिवसीय 'अभया' राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी विजया रहाटकर बोलत होत्या. लोहगाव येथील नीहार आनंदनिवासमध्ये आयोजित परिषदेत वंचित विकास संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह व संचालक मीना कुर्लेकर, सुनीता जोगळेकर, मीनाक्षी नवले, देवयानी गोंगले, रंजना चव्हाण, आणि उदयकाळ फाउंडेशनचे बाळकृष्ण बागुल, मयूर बागुल आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील एकल महिलांवर काम करणाऱ्या विविध जिल्ह्यातील ५० सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले आहेत.

विजया रहाटकर म्हणाल्या, "भारतीय कुटुंबपद्धती समाजव्यवस्थेचा आदर्श होता. मात्र, अलीकडच्या काळात विभक्त कुटुंबपद्धतीने समाजात अस्थिरता वाढली आहे. महिला एकाकी पडत आहेत. महिला घरदार सांभाळून घेत असते. मात्र, तिच्यावर वेळ येते, तेव्हा परिस्थिती, जवळची माणसे कठोर होतात. असंख्य अडचणींचा सामना त्यांना करावा लागतो. मान, सन्मान व स्वतःच्या हक्कांसाठी झगडावे लागते. महिला सन्मान व संरक्षणासाठी कायदे आहेत. तरीही अत्याचाराच्या घटना थांबत नाहीत. समाज म्हणून आपण भान जपायला हवे. मनातून आणि डोक्यातून एकल महिला ही कल्पना काढून टाकली आणि त्यांना अभय संबोधले, त्यांना आपल्यात सामावून घेतले, तर त्यांचे एकाकीपण दूर होण्यास निश्चित मदत होईल."

"अभया ही सक्षम असते, तिला आधाराची, सकारात्मक मानसिकता देण्याची गरज असते. प्रेम, स्नेह व आपलेपणा तिला या संघर्षात ऊर्जादायी ठरतात. त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्थांची भूमिका ही 'कॅटॅलीस्ट'सारखी आहे. समाजाचा स्वीकार आणि सकारात्मक भावना विकसित करण्यात संस्थांनी पुढाकार घ्यावा. महिला आयोग म्हणून अभयाच्या समग्र विकासासाठी काही शिफारशींवर आमचे काम सुरु आहे. येत्या काळात या शिफारसी केंद्र सरकारकडे देऊ. तसेच ही चळवळ देशातील इतर राज्यांमध्ये घेऊन जाण्यात महिला आयोग पुढाकार घेईल," असा शब्द विजया रहाटकर यांनी दिला.

प्रास्ताविकात मीना कुर्लेकर म्हणाल्या, "नरेंद्र मोदी सरकारचे धोरण स्त्रियांना सन्मान देणारे आहे. त्यांचे सक्षमीकरण करणारे आहे. एकल महिलांच्या प्रश्नाची गंभीरता महिला आयोगाच्या माध्यमातून केंद्र शासनापर्यंत पोहोचवावी. अभया ही चळवळ देशपातळीवर घेऊन जाण्यात विजयाताई पुढाकार घेतील, असा विश्वास वाटतो."

एकल महिलांचे प्रश्न व सामाजिक संस्थेची जबाबदारी, तसेच कामात येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी परिषदेमध्ये विविध चर्चासत्रे आयोजिली होती. आर्थिक साक्षरतेवर स्वाती दुधाले, एकल महिलांचे भावनिक व मानसिक व्यवस्थापनावर डॉ. सागर पाठक यांनी मार्गदर्शन केले. शासकीय योजना व सामाजिक संस्थांना संधी याविषयीची माहिती शासकीय प्रतिनिधींनी दिली.



## ज्येष्ठ नागरिक चोरट्यांचे 'लक्ष्य', धान्य वाटपाचे आमिष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'मोफत साडी, धान्य वाटप, शेठला मुलगा झाला आहे', अशी बतावणी करुन शहरात ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्यचे प्रकार वाढीस लागले आहेत. चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत ज्येष्ठ नागरिकांकडील बतावणी करुन त्यांच्याकडील पाच लाखांचा ऐवज चोरुन नेला. पर्वती, भारती विद्यापीठ आणि हडपसर भागात फसवणुकीच्या घटना घडल्या. भारती विद्यापीठ परिसरातील चंद्रभागा सोसायटी रस्त्यावर ज्येष्ठ महिलेकडे बतावणी करुन त्यांच्याकडील ५५ हजारांचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना घडली. याबाबत एका ६२ वर्षीय महिलेने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोंढव्यातील काकडे वस्ती परिसरात राहायला आहेत. त्या रविवारी दुपारी सव्वाएकच्या सुमारास भारती विद्यापीठ परिसरातून निघाल्या होत्या. आमच्य भागातील नगरसेवकाला मुलगा झाला आहे. ते ज्येष्ठ महिलांना साडी वाटप करत आहेत, अशी बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. तुमच्याकडील दागिने काढून पिशवी ठेवा, असे सांगून चोरट्यांनी त्यांना बोलण्यात गुंतविले. पिशवीतून ५५ हजारांचे दागिने चोरुन चोरटे पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी तपास करत आहेत. पर्वतीतील शाहू वसाहत परिसरात अशाच प्रकारची घटना घडली. याबाबत एका ७० वर्षीय ज्येष्ठ महिलेने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

तक्रारदार महिला शाहू वसाहतीत राहायला आहेत. रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास त्या शाहू वसाहत परिसरातून निघाल्या होत्या. चोरट्यांनी त्यांना अडवले. आमच्य शेठला मुलगा झाला आहे. ज्येष्ठ महिलांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले. चोरट्यांनी त्यांना दागिने काढून पिशवीत ठेवण्यास सांगितले. त्यांना बोलण्यात गुंतवून चोरट्यांनी पिशवीतील एक लाख २६ हजारांचे दागिने चोरुन नेले.

## आर.एम.डी. सिंहगड इन्स्टिट्यूटच्या एन.एस.एस. शिबिरामध्ये

# विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**लक्ष्मण साबळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर एम डी सिंहगड इन्स्टिट्यूट च्या राष्ट्रिय सेवा योजनेच्या एकका द्वारे कुडजे गावांमध्ये सात दिवसीय हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर 15 जानेवारी 2025 ते 21 जानेवारी 2025 या कालावधीत घेण्यात आले. या शिबिराच्या अंतर्गत विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचा हेतू हा कुडजे येथील ग्रामस्थ,गावचे विद्यार्थी आणि शिबिरातील सहभागी विद्यार्थी यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकीची जागृती करणे हा होता. तसेच कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. वैभव दीक्षित (प्राचार्य) व डॉ.



सचिन कुलकर्णी हे उपस्थित होते. डॉ. वैभव दीक्षित (प्राचार्य) यांनी केलेल्या कामानिमित्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील कामासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे ग्राम विकासामधील योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये आणि गावातील युवकांमध्ये समाजकार्याची गोडी निर्माण होण्याचे महत्त्वाचे कार्य शिबिराच्या माध्यमातून होत असलेले त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

याच बरोबर शिबिरामध्ये वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता अभियान, स्त्री सशक्तीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, प्रौढ शिक्षण आणि योगा शिक्षण यासारखे विविध उपक्रम राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री ज्ञानेश्वर घुगे यांनी शिबिरात घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली तसेच घेण्यात आलेल्या उपक्रमाच्या माध्यमातून ग्राम विकासाला लागलेला हातभार याबद्दल माहिती दिली.

तसेच शिबिराला कुडजे गावच्या सरपंच कु. मानसीताई सोनवणे, ग्रामसेवक रेखा रणवरे, श्री. समीर पायगुडे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले व केलेल्या कामाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शिबिरातील सर्व कार्यक्रमांचे आयोजन हे कार्यक्रम अधिकारी प्रो. ज्ञानेश्वर घुगे व प्रो. अश्विनी दुधमळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिराला आर.एम.डी. सिंहगड कॉलेजचे प्रो. अमृतराज खेमलापुरे, प्रो. राहुल कापसे, प्रो. अंजली शिरसाट, श्री अक्षय खेंगट, सौ. शकुंतला जाधव, श्री संजय खेडकर, श्री. दिलीप पाटील तसेच कु. कावेरी पायगुडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## लायन्स क्लब पुणेच्यावतीने धानेप प्राथमिक शाळेचे नूतनीकरण

**लक्ष्मण साबळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धानेप ता. वेल्हे येथील प्राथमिक शाळेस नूतनीकरणाची गरज होती. ही गरज ओळखून लायन्स क्लब ऑफ पुणे सेंटरच्या वतीने व सौ. योगिता मराठे यांच्या समन्वयाने धानेप शाळेस दोन वर्गखोल्या, किचनशेड व शौचालय यांचे नूतनीकरण करण्यात आले.

ह्याचे लोकार्पण 26 जानेवारी 2025 प्रजासत्ताक दिनाचे औचित्य करण्यात आले.

नूतनीकरण केलेल्या ह्या वास्तुचे जि. प. प्राथमिक शाळा धानेपला हस्तांतरण करण्यात आले. लागणारा सर्व फंड लायन्स क्लब ऑफ पुणे सेंटर यांनी केला. याचे उद्घाटन प्रांतपाल लायन विजयजी सारडा यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

प्रमुख पाहुणे- लायन जितेंद्रजी



मेहता उपस्थित होते. अध्यक्ष- लायन नवनाथ धनवडे, सचिव- लायन दीपक मैड खजिनदार- लायन निखिल मेहता.प्रोजेक्ट इन चार्ज -लायन श्रीकांत बाहेती या सर्वांमुळे हे काम पूर्णत्वास गेले .

किरण कुमार पाटील यांनी लायन्स क्लब व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानेप यांच्यातील दुवा साधला. यावेळी लायन्स क्लब ऑफ पुन्हा सेंट्रल चे RC लायन प्रितीजी दिक्षित व अनेक प्रतिनिधी ग्रा पं सरपंच , उपसरपंच ,सदस्य व पालक मोठ्या संख्येने हजर होते.

धानेप गावचे सरपंच श्री .राहूल मळेकर यांनी JCB लावून मैदान सपाटीकरण करून दिले. त्यांचेही सहकार्य लाभले. शाळेतील शिक्षिका सौ. वैशाली नांदवडेकर व श्री. रमेश भोकटे सर यांनीही काम पुर्ण करून घेण्यास मदत केली. मुख्याध्यापक- श्री मोहन धरपाळे यांनी सर्वांचे स्वागत करताना सांगितले कि , या वास्तुनिर्मितीमुळे तळागाळातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती देण्याचा प्रयत्न लायन्स क्लबच्या माध्यमातून झाला आहे. सौ योगिता मराठे मॅडम यांनी सुत्रसंचालन केले . श्री विठ्ठल डोईफोडे -अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती यांनी आभार मानले.

## शहरात वेगवेगळ्या अपघातात चौघांचा मृत्यू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात वेगवेगळ्या अपघातात चौघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. येरवडा, कात्रज-मंतरवाडी बाह्यवळण मार्ग, पुणे-सोलापूर रस्त्यावर अपघाताच्या घटना घडल्या. येरवडा भागात भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

दत्ता शंकर शेळके (वय २९, रा. राजीव गांधीनगर, येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत शेळके यांची बहीण जनाबाई सुंदरसिंग बायस (वय ४२, रा. रांजणी, ता. घणसांगवी, जि. जालना) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार दत्ता हे २७ जानेवारी रोजी पहाटे येरवड्यातील डॉन बॉस्को शाळेसमोरुन निघाले होते. त्या वेळी भरधाव वाहनाने त्यांना धडक दिली. गंभीर जखमी झालेल्या दत्ता यांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला. अपघाताानंतर पसार झालेल्या वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक विभुते तपास करत आहेत.

कात्रज-मंतरवाडी बाह्यवळण मार्गावर भरधाव मोटारीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. हेमंत अरविंद शिंदे (रा. प्राजक्ता बिल्डींग, पापडे वस्ती, फुरसुंगी) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मोटारचालक अमोल एकनाथ काळे (वय ३६, रा. सिल्व्हर पार्क, ऊरळी देवाची, सासवड रस्ता) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत हेमंत शिंदे यांचा भाऊ सागर (वय ४५) यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# समाजाची वेदना कवितेतून मांडतो - अनंत राऊत

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

माझी कविता प्रामाणिक व शेती मातीशी नाते सांगणारी आहे. मी पुरस्कारासाठी कविता लिहीत नाही. समाजाची वेदना कवितेतून मांडल्यामुळे महाराष्ट्राने माझ्या कवितेवर प्रेम केल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती



व्याख्यानमालेत 'माझ्या कविता तुमच्यासाठी' या विषयावर बोलत होते. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. सर्जेराव पानसरे, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर प्रबंधक के. आर. पाचारणे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

अनंत राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आत्मविश्वास हे यशाचे रहस्य असून ते तुमच्या जगण्यातून येत असते, असे सांगितले. शेती आणि मातीशी निगडित असलेली माणसे पुढे जातात. प्रत्येकाचा खरा हिरो त्याचे जन्मदाते आई-वडील असतात. त्यांचा सन्मान करा. आपला संघर्ष हा आपला असतो. त्याची जबाबदारी आपली असते. नशीब नावाच्या गोष्टीवर विश्वास ठेवू नका. प्रयत्न करीत राहा. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास तलवार, ढाल, घोडा यांच्या पलीकडे जाऊन अभ्यासण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

माणसाचे श्रेष्ठत्व हे कर्तृत्वावर ठरते जन्मावर ठरत नाही. माणूस हा व्यसनाधीन, वासनाधीन नसावा तर तो वाचणारा असावा. तरुण वर्ग हा देशाचा तारणहार असून तो बदलला तरच इतिहास बदलेल इतकी ताकद त्यांच्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

करिअर होईपर्यंत राजकारणी लोकांच्या नादी लागू नका. ज्या माणसाला त्याची परिस्थिती प्रेरणा देऊ शकत नाही त्याला कोणीच वाचवू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले. इतिहास हा प्रवाहाच्या विरुद्ध राहणाऱ्यांचा असतो. त्यामुळे लढत राहा, असे ते म्हणाले. राजकारणात राहूनही निष्कलंक राहिलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे साहेबराव बुट्टेपाटील असे गौरवोद्गार काढून त्यांचे समाजकारण विद्यार्थ्यांनी समजून घेण्याचे आवाहन केले.

या व्याख्यानात त्यांनी 'मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा..', रडतोस काय वेड्या, तुज्या गावावरून, तुला चोरून पाहीन मी, मायबाप या सुप्रसिद्ध कविता सादर करीत सर्वांची वाहवा मिळवली.

# थोडक्यात



## वेळ पाळा, तरच पूर्ण वेतन!

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महापालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी-अधिकारी कार्यालयात वेळेवर हजर राहत नसल्याच्या तक्रारी महापालिका आयुक्त कार्यालयाकडे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे वेळेवर कार्यालयात हजर नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात होणार आहे. यासाठी महापालिका कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या ज्या कार्यालयात काम नेमून दिले आहे, त्यासाठी वेळेत हजर राहावे, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अनेकदा केल्या आहेत. मात्र, वारंवार सूचना देऊनही महापालिकेतील अनेक अधिकारी, तसेच कर्मचारी कामाच्या वेळेत कार्यालयातून गायब असल्याचे दिसले आहे. याची गंभीर दखल घेऊन या पुढील काळात कर्मचाऱ्यांचे वेतन बायोमेट्रिक हजेरीनुसारच देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. महापालिका कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा आहे. त्यानुसार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कामाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. जेवणासाठी दुपारी २ ते २.३० वेळ आहे. मात्र, अनेक जण कार्यालयात सकाळी ११ वाजेपर्यंत येतात, तर सायंकाळी साडेपाच वाजताच कार्यालयातून घरी जातात. हे कर्मचारी बायोमेट्रिक नोंद न करता हजेरी पुस्तकात सह्या करतात. 'हजेरी पुस्तकामध्ये वेळेची नोंद होत नसल्याने नुसत्या सह्यांवर संबधित कर्मचारी आणि अधिकाऱ्याचे वेतन निघते. मात्र, यापुढील काळात हजेरी पुस्तकानुसार उपस्थिती गृहीत धरून वेतन काढले जाणार नाही. संबधित कर्मचारी आणि अधिकारी यांच्या बायोमेट्रिक हजेरीची तपासणी करून त्यानंतरच त्यांचे वेतन दिले जाणार आहे,' असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

## जीबीएसच्या ३८ रुग्णांना डिस्चार्ज

पुणे (आरंभ पर्व) : राज्यात गुलेन बॅरी सिंड्रोम या मेंदूविषयक आजाराने गेल्या काही दिवसांत चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. दररोज रुग्णसंख्येमध्ये नऊ ते दहा रुग्णांची वाढ होत आहे. दिलासादायक बाब म्हणजे जीबीएसमधून बरे होत असलेल्या 38 रुग्णांना आतापर्यंत डिस्चार्ज देण्यात आला आहे. व्हेंटिलेटरवर असलेल्या रुग्णांची संख्या 28 वरून 21 पर्यंत घटली आहे. जीबीएस आजाराच्या नवीन नऊ रुग्णांची नोंद झाली आहे. एकूण रुग्णसंख्या 158 इतकी नोंदवली गेली आहे. यापैकी 83 रुग्ण महापालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील आहेत. उर्वरित 31 रुग्ण पुणे महापालिका, 18 पिंपरी चिंचवड महापालिका, 18 रुग्ण पुणे ग्रामीणमधील आहेत. इतर जिल्ह्यांमधील रुग्णसंख्या आठ आहे. एकूण रुग्णांपैकी 21 रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत, तर 48 रुग्ण आयसीयूमध्ये उपचार घेत आहेत. घरोघरी सर्वेक्षण करून आजपर्यंत पुणे पालिकेतील 40 हजार 802 घरे, पिंपरी- चिंचवड महापालिकेतील 11 हजार 203 घरे आणि पुणे ग्रामीणमधील 12 हजार 571 अशा एकूण 64 हजार 567 घरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. शहराच्या विविध भागांमधील 160 पाणी नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले आहेत. त्यापैकी पाण्याचे आठ नमुने पिण्यास अयोग्य आहेत.

## 'एमपीएससी'कडून 45 जणांची नियुक्ती रद्द

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब सेवा मुख्य परीक्षा 2023 या परीक्षेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीने शिफारस केलेल्या 164 उमेदवारांपैकी दिलेल्या मुदतीत 45 उमेदवार रुजू न झालेल्या संबंधित उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने घेतला आहे. सहाय्यक कक्ष अधिकारी संवर्गाच्या एकूण 164 पदांसाठी दिनांक 5 नोव्हेंबर 2023 रोजी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल 11 ऑक्टोबर 2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. सरळ सेवा सहाय्यक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा 2023 च्या अंतिम निकालाच्या आधारे आयोगाने शिफारस केलेल्या 164 उमेदवारांची या विभागाच्या मंत्रालयीन विभागात / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात सहाय्यक कक्ष अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्याचबरोबर उमेदवारांना नियुक्तीचा स्वीकार करण्यासाठी 10 डिसेंबर 2024 पर्यंतची मुदत देण्यात आली होती. सरळसेवा सहाय्यक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा 2023 मधून नियुक्त झालेल्या 18 उमेदवारांनी केंद्र/राज्य शासनाच्या सेवेत अगोदरच कार्यरत असल्यामुळे सहाय्यक कक्ष अधिकारी पदावर रुजू होण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली होती. अशा 18 उमेदवारांना नियुक्तीचा स्वीकार करण्यासाठी 9 जानेवारी 2025 पर्यंत मुदतवाढही देण्यात आली.

## जिल्हाधिकारी कार्यालयांचा कारभार पूर्णपणे ऑनलाइन

पुणे (आरंभ पर्व) : जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभागात ई-फाइल्सच्या माध्यमातून 100 टक्के ऑनलाइन काम सुरू झाले आहे. दुसरीकडे प्रांत, तहसील आणि मंडल कार्यालयात ई-ऑफिसचे काम प्रलंबित आहे. या कार्यालयातील ई-ऑफिसचे कामकाज लवकरच सुरू होणार असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले. ऑक्टोबर 2024 जिल्हाधिकारी कार्यालयात तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी ई-ऑफिस प्रणाली राबविण्यास सुरुवात करण्यात आली होती. मात्र, ती पूर्ण क्षमतेने सुरू झाली नव्हती. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ई-ऑफिसनुसार सर्व विभागांनी कामकाज सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सर्व विभागांमध्ये ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून ई फाइल्सनुसार काम सुरू झाले आहे. ई-ऑफिसमध्ये कोणतीही फाइल काही मिनिटांत शोधणे शक्य होणार आहे. मात्र, तहसीलदार, प्रांत कार्यालयांमध्ये ई-ऑफिसचे काम रखडले आहे.

### मांजरी गाव महापालिकेत जाऊन सुध्दा

# पाणी टंचाईचे संकट कायम

**सचिन सुंबे**

- **तीन ते चार दिवस नळाला पाणीच नाही**



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
मांजरी ग्रामपंचायत पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर येथे सुधारणा होण्याऐवजी नागरिकांच्या समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या असुन 'गड्या आपला गावच बरा' असे नागरिक म्हणत आहेत . मांजरी व महादेवनगरचे नागरिकरण गेल्या सात वर्षात झपाट्याने झाले . मांजरी ग्रामपंचायत होती त्यावेळी थोडासा पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी प्रयत्न केला गेला.पेयजल योजना मंजुर झाली होती व ती काही ठिकाणी पुर्ण झाली. त्यातच गाव पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्याने नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यास महापालिका असमर्थ ठरत असल्याचे दिसून येत आहे.

मांजरी गाव महापालिकेत जाऊन सुध्दा पाणी टंचाईचे संकट कायम असुन वर्षानुवर्षे मांजरीकरांची पाणी टंचाई काही दुर होताना दिसत नाही .

मांजरी भागात महादेव नगर ,मांजरी गावठाण येथे काही ठिकाणी तीन ते चार दिवस नळाला पाणी येत नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

तर काही भागात ओळख असेल तिथे दोन ते तीन दिवसांनी पाणी सोडले जाते असे नागरिकांचे म्हणने आहे. ते पण थोडया वेळ पर्यंत .त्यामुळे मांजरी भागात उन्हाळा सुरू होण्यापूर्वी तीव्र पाणी टंचाई जाणवु लागल्याने नागरिकांच्या मध्ये चिंता वाढली आहे.

दोन्ही कॅनलला पाणी नसल्याने या भागातील बोअरवेल व विहिरी आटल्या आहेत. मांजरी, महादेव नगर भागात कित्येक वर्षे पाणी टंचाई निर्माण होत असुन भविष्यात टंचाई दुर होऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल का ?या आशेवर येथील नागरिक अनेक वर्षांच्या प्रतिक्षेत आहेत.

> **वॉल बसविण्याचे काम ठिक ठिकाणी चालू असुन अधिकाऱ्यांना या विषयीची कल्पना दिली आहे. लवकरच पाणी पुरवठा सुरुळीत होईल.**
> **- आमदार चेतन तुपे पाटील**

> **मांजरी पाणीपुरवठया विषयी अधिकाऱ्यांना भेटुन आमदार चेतन तुपे पाटील यांच्या मार्फत उन्हाळ्यात सुध्दा पाणीपुरवठा सुरुळीत कसा राहील यासाठी काळजी घेतली जाईल.**
> **- अजित घुले**
> **शासननियुक्त नगरसेवक**

पेयजल योजना ४४कोटींची मंजूर करून झाली . तिचे काम चालू केले. अजुन पर्यंत ती योजना का पुर्ण होऊ शकली नाही याचे कोडे मांजरीकरांना पडले आहे.

## अल्ट्राकॅब लिमिटेड कंपनीने राइट्स इश्यू सबस्क्रिप्शनसाठी उघडला

ULTRACAB®
WIRES & CABLES
GHAR SURAKSHIT - AAP SURAKSHIT

**गुजरात (दै. आरंभ पर्व)**
भारतात इलेक्ट्रिक वायर्स आणि केबल्सचे उत्पादन आणि निर्यात करण्यात गुंतलेली, अल्ट्राकॅब (इंडिया) लिमिटेड (BSE-538706) 28 जानेवारी 2025 पासून 4981 लाख रुपयाचे राइट्स इश्यू सबस्क्रिप्शनसाठी उघडला आहे. कंपनीची योग्य इश्यू किंमत 14.5 रुपये प्रति शेअर आहे आणि ते 11 फेब्रुवारी 2025 रोजी बंद होईल.

कंपनीच्या राइट्स इश्यूमध्ये सहभागी होण्यासाठी/सदस्यता घेण्यासाठी गुंतवणूकदार बीएसई वरून अल्ट्राकॅब (इंडिया) लिमिटेडचे राइट्स एंटाइटलमेंट्स (बीएसई सिम्बॉल: 750951) खरेदी करू शकतात. राइट्स ऑन-मार्केट हक्क स्वीकारण्याची अंतिम मुदत 5 फेब्रुवारी 2025 आहे.या इश्यूसाठी राइट्स एंटाइटलमेंट्स रेशियो : 9:25 ( रेकॉर्ड डेट 16 जानेवारी, 2025 रोजी शेअरधारकांनकडून ठेवण्यात आलेले प्रत्येक 25 इक्विटी शेअर साठी 9 राइट्स इक्विटी शेअर) निश्चित केले आहेत. कंपनी 3.43 कोटी पूर्ण पेड-अप इक्विटी शेअर्स प्रति शेअर 2 रुपये फेस व्हॅल्यू जारी करेल.

मार्च-2024 ला संपलेल्या आर्थिक वर्ष 2024 साठी, कंपनीचा निव्वळ नफा 598 लाख रुपये आहे, जे मागील वर्षी याच कालावधीत 582 लाख रुपये होता.

याशिवाय, FY2024 मध्ये कंपनीचा आवक 12439 लाख रुपये नोंदवली गेली, जे आर्थिक वर्ष 2023 मध्ये 10767 लाख रुपये होती राईट्स इश्यूद्वारे जमा केलेला निधी कर्जाच्या पूर्वपेमेंट/परतफेडसाठी, कंपनीच्या भांडवलाच्या गरजा वाढवण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी वापरला जाईल.

## पुणे मेट्रोसाठी अर्थसंकल्पात ८३७ कोटींची तरतूद



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात पुणे मेट्रोसाठी ८३७ कोटी रुपयांची तरतूद जाहीर झाली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका (पीसीएमसी) ते निगडी आणि स्वारगेट ते कात्रज (भुयारी) या मेट्रो मार्गिकांच्या कामांना आता वेग येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनीदेखील नवीन आर्थिक वर्षातील तरतुदीच्या मागणीनुसार अपेक्षित निधी प्राप्त झाला असल्याची स्पष्टोक्ती दिली असून, पुण्यातील या दोन्ही प्रकल्पांना गती मिळणार असल्याचे सांगितले. केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांनी शनिवारी (१ फेब्रुवारी) जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात वाहतूक, दळणवळण, उद्योग, माहिती तंत्रज्ञान, आणि इतर सुविधांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तरतुदींमध्ये पुणे मेट्रोच्या विस्तारासाठी विशेष तरतूद केल्याचे दिसून आले. याबाबत अधिक माहिती सांगताना हर्डीकर म्हणाले, 'पुण्यातील मेट्रो विस्ताराच्या अनुषंगाने दुसऱ्या टप्प्यातील मार्गिकांच्या कामासाठी साधारणत: चार हजार कोटी रुपयांची कामे मंजूर आहेत. त्यापैकी ७१५ कोटी आणि उर्वरित भागभांडवल असे मिळून ८३७ कोटी रुपयांना मंजुरी मिळाली आहे, तर प्रस्तावित प्रकल्पातील करार जसेजसे मार्गी लागतील त्या प्रमाणे निधी प्राप्त होत जाईल. त्यामुळे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील मार्गिकांचे विस्तारीकरण वेगाने होणार आहे.'

## शिवरथ यात्रा पालखी सोहळा ४ फेब्रुवारीला



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
सह्याद्री प्रतिष्ठान ही संस्था गेली १६ वर्षे राज्यातील गडकोटांचे संवर्धनाचे कार्य करत आहे. स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचे सुवर्ण साक्षीदार असलेल्या गडकोटांचे संवर्धनासाठी लोक सहभाग वाढावा तसेच दुर्गसंवर्धनाची चळवळ अखंड महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, शहर, तालुका, जिल्हा विभागात पोहचवता यावी याच मुळ उद्देशाने प्रतिवर्षी ३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मभूमी दुर्ग शिवनेरी ते दुर्गदुर्गेश्वर दुर्ग रायगड पर्यंत भव्य-दिव्य असा हा शिवरथ यात्रा पालखी सोहळा दरवर्षी आयोजित करण्यात येतो. यावर्षी सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ ते शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आयोजीत केलेला असून हे १५ वे वर्ष आहे.

शिवरथ यात्रा पालखी सोहळा मार्ग-क्रम खालीलप्रमाणे राहील :-

पहिला दिवस - सोमवार, ३ फेब्रुवारी २०२५ (७२ किमी)

शिवजन्मभूमी दुर्ग शिवनेरी प्रस्थान - जुन्नर - नारायणगाव (भोजन) कळंब मंचर पेठ राजगुरूनगर - चाकण - कुरूळी (मुक्काम)

दुसरा दिवस - मंगळवार, ४ फेब्रुवारी २०२५ (६५ किमी)

कुरूळी - आळंदी - शंभूतीर्थ तुळापूर - लोणीकंद वाघोली- मांजरी खुर्द-कदमावकवस्ती (भोजन) लोणी काळभोर, थेऊर फाटा - सोरतापवाडी फाटा, उरूळी कांचन (मुक्काम)

तिसरा दिवस - बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५ (९४ किमी)

उरूळी कांचन - शिंदवणे घाट वाघापूर बेलसर जेजुरी वाल्हे वीर न्हावी भोंगवली फाटा राजापूर (भोजन) सारोळा शिंदेवाडी विंग वडगाव डाळ - उत्रौली - आपटी (मुक्काम)

चौथा दिवस - गुरूवार, ६ फेब्रुवारी २०२५ (८५ किमी)

आपटी - वरंधा घाट - ढालकाठी (भोजन) महाड एमआयडीसी महाड शहर रायगड खिंड वीर मुरारबाजी देशपांडे स्मारक किंजळोली -पाचाड (मुक्काम)

पाचवा दिवस -शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ : पाचाड - राजमाता जिजाऊँसाहेब स्मारक दुर्गराज रायगड पायथा पायरी मार्ग महादरवाजा श्री शिरकाई देवी मंदिर - बाजार पेठ - जगदिश्वर मंदिर श्री शिवसमाधी होळीचा माळ नगरखाना राजसदर महाभिषेक - यात्रेचा समारोप

तरी सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे असे सह्याद्री प्रतिष्ठानने दिलेल्या आमंत्रणात म्हटले आहे . अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे हे उरुळी कांचन येथे एका कार्यक्रमासाठी आले असता त्यांना आमंत्रण देण्यात आले. यावेळी गुलाब गायकवाड, गजानन जगताप, सुनील तुपे, सचिन सुंबे, अनिरुद्ध मराठे, अमोल भोसले, भाऊसाहेब महाडिक ,भाऊसाहेब जाधव, शशिकांत चौधरी, संदीप कुंजीर, शेखर साळुंखे, नवनाथ नेवाळे, अतुल मोरे आदी उपस्थित होते.

# प्रभावी आयुर्वेदासाठी संशोधन, इनोव्हेशनला चालना देणार

- **प्रतापराव जाधव यांचे प्रतिपादन**
- **'डॉ. डी. वाय पाटील'मध्ये आठव्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनाचे उद्घाटन**




**पिंपरी/पुणे (दै. आरंभ पर्व) :**
"आयुर्वेद सर्व प्रकारच्या व्याधींवर परिणामकारक उपचारपद्धती आहे. आयुर्वेदाला जगभर सर्वमान्यता मिळू लागली आहे. प्रभावी आयुर्वेदासाठी संशोधनाची व्याप्ती वाढवण्यासह इनोव्हेशन व स्टार्टअप सुरु करण्यासाठी आयुष मंत्रालयामार्फत चालना देणार आहे," असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. सर्वगुणकारी आयुष औषधी सहज उपलब्ध होण्यासाठी देशभरात आयुष औषधी केंद्रांचे जाळे उभारण्यात येणार असल्याचेही प्रतापराव जाधव यांनी नमूद केले. पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठ संचालित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटर पुणे, यांच्या पुढाकाराने नवी दिल्ली येथील ऑल इंडिया आयुर्वेद काँग्रेस, नेदरलँड येथील इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशन व इंटरनॅशनल अकॅडमी ऑफ आयुर्वेद यांच्या सहकार्याने आयोजित आठव्या इंटरनॅशनल आयुर्वेद काँग्रेसचे (आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलन) उद्घाटन प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले. पिंपरी येथील विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, कुलगुरू डॉ. एन. जे. पवार, प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. स्मिता जाधव, खासदार श्रीरंग बारणे, अमेरिकास्थित शास्त्रज्ञ डॉ. टोनी नाडर, आयुष मंत्रालयाचे सल्लागार सचिव वैद्य मनोज नेसरी, नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसिनचे चेअरमन वैद्य जयंत देवपुजारी, 'आयुष'चे नॅशनल रिसर्च प्रोफेसर डॉ. भूषण पटवर्धन, ऑल इंडिया आयुर्वेद काँग्रेसचे चेअरमन वैद्य देवेंद्र त्रिगुणा, इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशनचे डॉ. गिरीश मोमया, इंटरनॅशनल अकॅडमी ऑफ आयुर्वेदाचे प्रा. डॉ. सुभाष रानडे, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ. गुणवंत येवला आदी उपस्थित होते.

संमेलनामध्ये जागतिक स्तरावर आयुर्वेद प्रसारासाठी डॉ. गुणवंत येवला आणि डॉ. वॉल्टर मोईल्क यांना 'आयुर्वेद धन्वंतरी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. आयुर्वेदातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. संजीव गोयल, डॉ. अखिलेश वर्मा, डॉ. एस. एन. पांडे, डॉ. रामदास आव्हाड यांना सन्मानित करण्यात आले. आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसिनच्या मान्यतेने झालेल्या या दोन दिवसीय संमेलनाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील संशोधन संचालक प्रा. डॉ. अस्मिता वेले, कायाचिकित्सा विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. जी. दीपांकर, रचना विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. योगेश कुट्टे यांनी परिश्रम घेतले. दहा देशातील १०० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ आणि १२०० हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील संशोधक, वैद्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. ५०० हुन शोधनिबंध सादर झाले.

प्रतापराव जाधव म्हणाले, "योग व आयुर्वेद ही भारताची ओळख आहे. शंभराहून अधिक देशांत आज आयुर्वेद पोहोचला आहे, तर १८० देशांत योगदिवस साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आयुर्वेदीय औषधांना, उपचारांना प्रभावी करण्यासाठी व मान्यता मिळण्यासाठी सखोल संशोधन होणे गरजेचे आहे. त्यामुळेच संशोधनावर भर दिला जात आहे. डॉ. डी. वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालयांसारख्या संस्थांमध्ये संशोधन व विकास केंद्राची उभारणी करण्याचा विचार सुरु आहे. अनेक औषधांना आयएसओ मानांकन दिले जात आहे. देशातही घराघरात आयुर्वेद जाण्यासाठी 'देश का प्रकृती परीक्षण' उपक्रम आणला असून, त्यामध्ये सव्वाकोटी लोकांची माहिती संकलित केली आहे." डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, "भारतातील पहिले आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलन पुण्यात आणि तेही आमच्या संस्थेत होतेय, याचा आनंद आहे. जगभरातील आयुर्वेदतज्ज्ञ, विद्यार्थी इथे आल्याने विचारांचे आदानप्रदान होत आहे. सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये आयुर्वेदाचा समावेश ही चांगली बाब आहे. वैदिक संस्कृती, आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पाऊल स्वागतार्ह आहे. आधुनिक शास्त्र आणि आयुर्वेद याची सांगड घालून संशोधनाधारित उपचारांची उपलब्धता समाजासाठी उपयुक्त ठरेल. आयुर्वेदाला प्रभावी, रास्त आणि सहज उपलब्ध करण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे."

प्रास्ताविकात डॉ. स्मिता जाधव म्हणाल्या, "या संमेलनाच्या माध्यमातून आयुर्वेदातील संशोधन, नाविन्यपूर्ण संशोधन, भविष्यकाळात आयुर्वेदाची व्याप्ती, गरजा, उपाय योजना आणि अनेक विकार आणि चिकित्सा या विषयावर विचारमंथन झाले. आंतरराष्ट्रीय स्तरावर आयुर्वेद, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण प्रयोग याविषयी जाणून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. अशा संमेलनामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढून इनोव्हेशन, स्टार्टअप्स संस्कृतीला चालना मिळते."

वैद्य मनोज नेसरी म्हणाले, "महर्षी आयुर्वेद ही जागतिक स्तरावरील मोठी सामाजिक संस्था आहे. आयुर्वेद उत्पादनांची निर्यात वाढत असून, या क्षेत्राचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत आहे. आयुर्वेद जगभर पोहोचत आहे. संशोधन होत आहे. त्यामुळे आयुर्वेदाची विश्वासार्हता व प्रभावीपणा दिवसेंदिवस वाढत आहे." डॉ. टोनी नेडर, वैद्य देवेंद्र त्रिगुणा, डॉ. सुभाष रानडे, डॉ. गिरीश मोमया, डॉ. जयंत देवपुजारी यांनीही मनोगते व्यक्त केली. डॉ. लोथर पियार्क व डॉ. योगेश कुट्टे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गुणवंत येवला यांनी आभार मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.